कार्या. ८६१
२८।७।८८

भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९

(सन १९७९ चा अधिनियम क्रमांक २४)

[ दिनांक १ एप्रिल १९८६ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Union Duties of Excise (Distribution) Act, 1979

(Act No. 24 of 1979)

*(As in Force on the 1st April 1986)*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई, यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.
१९८७

[ किंमत रु. ०.७० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ एप्रिल, १९८६ रोजी यथाविद्यमान असलेला दि युनियन ड्युटीज ऑफ एक्साईज (डिस्ट्रिब्युशन) ॲक्ट, १९७९ याचा मराठीतील प्राधिकृत अनुवाद दिलेला आहे. हा अनुवाद **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ४, अंक १, दिनांक ३-५-१९८६ यात पृष्ठ २३ ते २५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी अनुवाद, प्राधिकृत अनुवाद (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा अनुवाद, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी अनुवाद म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ३ मे, १९८६.

**एस. रामय्या,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Union Duties of Excise (Distribution) Act, 1979, as on the 1st April, 1986 contains the authorised translation of that Act in Marathi and the same was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 4, dated 3rd May 1986 on pages 23 to 25.

This authorised translation in Marathi was published under the Authority of the President under clause (a) of section 2 of the Authorised Translation (Central Laws) Act, 1973, and on such publication, it became the authorised translation of the Act Marathi.

New Delhi :
Dated 3rd May, 1986

S. RAMAIAH,
Secretary to the Government of India.

## संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९
## विशोधन अधिनियमांची सूची

१. संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) (विशोधन) अधिनियम, १९८४ (१९८४ चा २७).

२. संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) (विशोधन) अधिनियम, १९८५ (१९८५ चा २६).

# The Union Duties of Excise (Distribution) Act, 1979

## संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. संघराज्य उत्पादन शुल्कांच्या निव्वळ उत्पन्नाच्या काही भागाइतक्या रकमांचे राज्यांना प्रदान व त्या रकमांचे त्यांच्यामध्ये तात्पुरते वितरण.

४. प्रदान भारताच्या एकत्रित निधीवर भारित करावयाचे.

५. नियम करण्याचा अधिकार.

६. निरसन.

# संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९

**(सन १९७९ चा अधिनियम क्रमांक २४)**

(दिनांक १ एप्रिल, १९८६ रोजी अंमलात असल्याप्रमाणे)

[दिनांक २० मे, १९७९]

**वित्त आयोगाने [1][दिनांक ३० एप्रिल, १९८४ रोजीच्या आपल्या अहवालात] शिफारस केलेल्या तत्त्वांनुसार, शुल्क बसवणारा कायदा ज्यांना लागू होतो अशा राज्यांना विवक्षित संघराज्य उत्पादन शुल्काच्या निव्वळ उत्पन्नाच्या काही भागाइतक्या रकमांचे प्रदान भारताच्या एकत्रित निधीतून करण्याचा व त्या रकमांचे त्या राज्यांमध्ये वितरण करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास 'संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, दिनांक १ एप्रिल, १९७९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

[2][२. या अधिनियमामध्ये "वितरणयोग्य संघराज्य उत्पादन शुल्क" या शब्दप्रयोगाचा अर्थ 'केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४' याअन्वये आणि अशा शुल्काची आकारणी व उगराणी करण्यासाठी केलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये संघराज्य उत्पादन शुल्क आकारलेले व उगराणी केलेले असेल तेव्हा, — व्याख्या. (१९४४ चा १.)

(क) १ एप्रिल, १९८४ रोजी सुरू होणाऱ्या वित्तीय वर्षाच्या बाबतीत, विजेवरील संघराज्य उत्पादन शुल्क सोडून अन्य संघराज्य उत्पादन शुल्कांपासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या चाळीस टक्के रक्कम;

(ख) १ एप्रिल, १९८५ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या वित्तीय वर्षापैकी प्रत्येक वित्तीय वर्षाच्या बाबतीत, संघराज्य उत्पादन शुल्कापासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या पंचेचाळीस टक्के रक्कम;

असा आहे—मात्र, अशा कायद्यामध्ये शुल्काचे उत्पन्न कोणत्याही विशेष प्रयोजनार्थ अलग राखून ठेवण्याचा उपबंध नसावा.

**स्पष्टीकरण.**— "निव्वळ उत्पन्न" या शब्दप्रयोगास, संविधानाच्या अनुच्छेद २७९ च्या खंड (१) मध्ये त्या शब्दप्रयोगास दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे.]

---

[1] सन १९८५ चा अधिनियम २६, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९८५ रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ कलम २ ऐवजी घातले (१ एप्रिल, १९८५ रोजी व तेव्हापासून).

संघराज्य उत्पादन शुल्कांच्या निव्वळ उत्पन्नाच्या काही भागाइतक्या रकमांचे राज्यांना प्रदान व त्या रकमांचे त्यांच्यामध्ये तात्पुरते वितरण.

[1][३. [2][(१)] दिनांक १ एप्रिल, १९८४ रोजी सुरू होणाऱ्या वित्तीय वर्षामध्ये; त्या वर्षी आकारलेल्या व उगराणी केलेल्या वितरणयोग्य संघराज्य उत्पादन शुल्कांइतक्या रकमा राज्यांना भारताच्या एकत्रित निधीमधून देण्यात येतील व पुढील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या राज्यांपैकी प्रत्येक राज्यास त्याच्यासमोर स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या टक्क्यांच्या प्रमाणात त्या रकमांचे [3][वितरण करण्यात येईल] :—

तक्ता

| राज्य | टक्केवारी | राज्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश .. .. .. | ७.६९१ | मणिपूर .. .. .. | ०.२१८ |
| आसाम .. .. .. | २.७९३ | मेघालय .. .. .. | ०.२०० |
| बिहार .. .. .. | १३.०२१ | नागालँड .. .. .. | ०.०९७ |
| गुजराथ .. .. .. | ४.१०१ | ओरिसा .. .. .. | ४.६८२ |
| हरयाणा .. .. .. | १.१७७ | पंजाब .. .. .. | १.२२६ |
| हिमाचल प्रदेश .. .. | ०.५२१ | राजस्थान .. .. .. | ४.८१३ |
| जम्मू व काश्मीर .. .. | ०.८३९ | सिक्कीम .. .. .. | ०.०२८ |
| कर्नाटक .. .. .. | ४.८७६ | तामिळनाडू .. .. .. | ७.६३७ |
| केरळ .. .. .. | ४.०३५ | त्रिपुरा .. .. .. | ०.३७३ |
| मध्यप्रदेश .. .. .. | ८.७२५ | उत्तर प्रदेश .. .. .. | १८.२९० |
| महाराष्ट्र .. .. .. | ६.६३२ | पश्चिम बंगाल .. .. | ८.०२५.] |

[2][(२) १ एप्रिल, १९८५ पासून सुरू होणाऱ्या वित्तीय वर्षामध्ये आणि तीन अनुवर्ती वित्तीय वर्षांपैकी प्रत्येक वर्षामध्ये, त्या त्या वर्षी आकारलेल्या व उगराणी केलेल्या वितरणयोग्य संघराज्य उत्पादन शुल्कांइतक्या रकमा राज्यांना भारताच्या एकत्रित निधीमधून देण्यात येतील, आणि,—

(क्) अशा प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये याप्रमाणे प्रदेय असलेल्या रकमांच्या आठ-नवमांश रक्कम, पुढील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या राज्यांपैकी प्रत्येक राज्यास त्याच्यासमोर स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या टक्क्यांच्या प्रमाणात वितरण करण्यात येईल; आणि

(ख्) अशा प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये याप्रमाणे प्रदेय असलेल्या रकमांच्या एक-नवमांश रक्कम पुढील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या राज्यांपैकी प्रत्येक राज्यास त्याच्यासमोर स्तंभ (२) मध्ये त्या त्या वित्तीय वर्षाबाबत दर्शविलेल्या टक्क्यांच्या प्रमाणात वितरण करण्यात येईल.

[1] सन १९८४ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे मूळ कलम ३ ऐवजी घातले (१ एप्रिल, १९८४ रोजी व तेव्हापासून).

[2] सन १९८५ चा अधिनियम २६, कलम ४ द्वारे कलम ३ ला त्याचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोट-कलम (२) जादा दाखल केले (१ एप्रिल, १९८५ रोजी व तेव्हापासून).

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ (क्) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ एप्रिल, १९८५ रोजी व तेव्हापासून).

## तक्ता एक

| राज्य | टक्केवारी | राज्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश .. .. | ८.५८७ | मणिपूर .. .. | ०.२३३ |
| आसाम .. .. | २.९७७ | मेघालय .. .. | ०.१९४ |
| बिहार .. .. | १३.२०२ | नागालँड .. .. | ०.०९६ |
| गुजराथ .. .. | ३.५०६ | ओरिसा .. .. | ४.५९२ |
| हरयाणा .. .. | १.०१७ | पंजाब .. .. | १.३१७ |
| हिमाचल प्रदेश .. .. | ०.५८९ | राजस्थान .. .. | ४.६९५ |
| जम्मू व काश्मीर .. .. | ०.८५६ | सिक्कीम .. .. | ०.०३९ |
| कर्नाटक .. .. | ५.०७७ | तामीळनाडू .. .. | ७.३१७ |
| केरळ .. .. | ३.८०० | त्रिपुरा .. .. | ०.२९२ |
| मध्यप्रदेश .. .. | ८.८५२ | उत्तर प्रदेश .. .. | १९.०९७ |
| महाराष्ट्र .. .. | ६.२१६ | पश्चिम बंगाल .. .. | ७.४४९ |

## तक्ता दोन

| राज्य | वित्तीय वर्ष व टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|
| | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ |
| (१) | (२) | | | |
| आसाम .. .. .. | १२.५७८ | १२.७१३ | १३.४१८ | १२.०२३ |
| हिमाचल प्रदेश .. .. | ११.५२८ | १२.९१४ | १४.०९८ | १६.४७५ |
| जम्मू व काश्मीर .. .. | १६.६६१ | १७.८१८ | १८.५६० | २०.२५४ |
| मणिपूर .. .. .. | ७.७४२ | ८.७२२ | ९.५४५ | ११.२१७ |
| मेघालय .. .. .. | ६.१८० | ६.९४४ | ७.५७० | ८.८६३ |
| नागालँड .. .. .. | ९.९४४ | ११.२४० | १२.३७१ | १४.४८२ |
| ओरिसा .. .. .. | ८.१५४ | ५.४५७ | ३.१०९ | ०.५९८ |
| सिक्कीम .. .. .. | १.८३६ | २.०५१ | २.२३२ | २.५९३ |
| त्रिपुरा .. .. .. | ९.१०४ | १०.२०७ | ११.१६२ | १२.९५६ |
| पश्चिम बंगाल .. .. | १६.२७३ | ११.९३४ | ७.९३५ | ०.५३९.] |

प्रदान भारताच्या एकत्रित निधीवर भारित करावयाचे.

४. कलम ३ अनुसार प्रदानांवर होणारा खर्च भारताच्या एकत्रित निधीवर भारित करण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

५. (१) या अधिनियमाच्या उपबंधांखाली प्रदान करावयाच्या कोणत्याही रकमा कोणत्या वेळी व कोणत्या रीतीने प्रदान करावयाच्या यासंबंधी, एका वित्तीय वर्षाचे दुसऱ्या वित्तीय वर्षाशी समायोजन करण्यासंबंधी आणि इतर कोणत्याही आनुषंगिक किंवा साहाय्यभूत बाबींसंबंधी उपबंध करण्याकरिता केंद्र शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या कलमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तना-मुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधि-ग्राह्यतेस बाध येणार नाही.

निरसन.

६. 'संघराज्य उत्पादनशुल्क (वितरण) अधिनियम, १९६२' हा दिनांक १ एप्रिल, १९७९ रोजी व तेव्हापासून निरसित होईल. १९६२ चा ३.

## संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९

### The Union Duties of Excise (Distribution) Act, 1979

#### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आनुषंगिक | incidental | [क. ५ (१)] |
| साहाय्यभूत | ancillary | [क. ५ (१)] |

## The Union Duties of Excise (Distribution) Act, 1979

### संघराज्य उत्पादन शुल्क (वितरण) अधिनियम, १९७९

#### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ancillary | साहाय्यभूत | [S. 5 (1)] |
| incidental | आनुषंगिक | [S. 5 (1)] |

शामुना—ए-२६६-प्रभासंमुं—३-८७—५२०—पीए ४*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

* **संचालक**

मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
प्रकाशन शाखा, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
दूरध्वनी: ३५९१४६.

* **पर्यवेक्षक**

शासकीय ग्रंथागार
(केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
(फक्त स्थानिक विक्रीकरिता)
पृरुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१
वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
मुंबई ४०० ००१
दूरध्वनी: २९७५९४.

* **पर्यवेक्षक**

शासकीय ग्रंथागार
बडवे बिल्डिंग, भांडारकर इन्स्टिटयूट मार्ग, तिसरा मार्ग.
पी. वाय. सी. जिमखान्याजवळ, पुणे ४११ ००४
दूरध्वनी: ५६७५९.

* **व्यवस्थापक**

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
दूरध्वनी: २२६१५.

* **पर्यवेक्षक**

शासकीय ग्रंथागार
शहागंज, गांधी चौकाजवळ
औरंगाबाद ४३१ ००१
दूरध्वनी: ५५२५

आणि

* **महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**